# प्रेस नोट

आज दिनांक 08/03/2018 रोजी जागतीक महिला दिनानिमित्य पोलीस आयुक्तालय,अमरावती शहर तर्फे मा.पोलीस आयुक्त,अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली महिला सहायक कक्ष चे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती निलीमा आरज व कार्यलयीन अधिकारी व कर्मचारी यांचे संयुक्त विदयमानाने पोलीस आयुक्त कार्यालय येथील सभागृह येथे सकाळी 11.00 वा. सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांचे करीता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास अध्यक्षस्थान मा.दत्तात्रय मंडलीक सर.पोलीस आयुक्त अमरावती शहर तसेच प्रमुख पाहुने म्हणुन प्रा.श्रीमती मोना चिमोटे,मराठी विभाग प्रमुख,अमरावती विदयापीठ तसेच डॉ.श्रीमती निलीमा ठाकरे,(MBBS,DGO,DFW) या उपस्थित होत्या.

प्रा.श्रीमती मोना चिमोटे,मराठी विभाग प्रमुख,अमरावती विदयापीठ यांनी उपस्थित सर्व महिलाना नोकरी व कुंटुब यामध्ये कश्याप्रकारे समतोल राखावा तसेच समाजाचा तुमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन व अपेक्षा एकंदरित नोकरी, कुंटुब, समाज, व आपण यामध्ये कश्याप्रकारे समतोल राखुन आपले जिवन सुखकर बनवु शकतो याबद्दल मार्गदर्शन केले.पोलीस विभागात नोकरी करतानां महिलाकंडुन त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष केल्या जाते या विषयास अनुसरुन डॉ.श्रीमती निलीमा ठाकरे,(MBBS,DGO,DFW) यांनी महिलांना आहार कश्याप्रकारे व कधी ध्यावा तसेच महिलांच्या स्वास्थासंबंधी इतर समस्या या विषयी चर्चा करुन महिला कश्याप्रकारे स्वतःचे व कुंटुंबाचे स्वास्थ सुदृढ ठेवुन स्वतः कार्यक्षमपणे नोकरी करु शकतात याबद्दल मार्गदर्शन केले.मा.पोलीस आयुक्त सरांनी त्यांचे अध्यक्षिय भाषणात पोलीस विभागात कार्यरत महिला अधिकारी व कर्मचारी यांनी यांनी समाजात वावरतांना कश्याप्रकारे आपली वर्तनुक ठेवावी पिडीत महिलेला कश्याप्रकारे वागणुक दयावी याबद्दल मार्गदर्शन केले.तसेच कार्यक्रमास उपस्थित मा.सहायक पोलीस आयुक्त,गाडगेनगर विभाग श्रीमती चेतना तिडके यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सर्व महिला अधिकारी/कर्मचारी यांना महिला दिनाच्या शुभेच्छा देवुन पुढील वाटचालीसाठी सर्वानां मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमात सन 2017 मध्ये उल्लेखनीय काम करणा–या महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.कार्यक्रमास आयुक्तालयातील अधिकारी व 125 ते 150 महिला कर्मचारी उपस्थित होत्या.

पोलीस निरीक्षक
महिला सहायक कक्ष,अमरावती शहर

Scanned by CamScanner